कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्यव्यवसाय विभागातील पदुम विभागाकरीता ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमएलके-२०१८/प्र.क्र.७३/पदुम ८
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०००३२
दिनांक : ३ मे, २०१९

<u>वाचा :</u>

१) शासन निर्णय क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक मातंस-२०११/प्र.क्र.१२५/३९ दिनांक-२३/९/२०११

२) शासन निर्णय क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक १२५६/फाईल/डीआयटी/२०१२ दिनांक-२१/९/२०१२

३) शासन निर्णय क्रमांक मातंस-०८०/४/२०१४-०/० Directorate of IT-DIT (MH), दिनांक २० मार्च, २०१८.

प्रस्तावना :

राज्याचे प्रशासन अधिक गतिमान तसेच लोकाभिमुख करण्याचे दृष्टीने राज्यातील प्रशासकीय कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करुन नागरिकांना माफक दरात, जलद व पारदर्शकरित्या सेवा पुरविण्याच्या हेतुने राज्याचे ई-प्रशासन धोरण संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आलेले आहे. या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.१२.३ येथे संबंधित प्रशासकीय विभागांनी प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) स्थापन करावी यासंदर्भात मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.६ मध्ये प्रकल्प अंमलबजावणी समितीची रचना विहित करण्यात आली आहे. त्यानुसार कृषि व पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्यव्यवसाय विभागातील पदुम विभाग तसेच त्याखालील क्षेत्रिय कार्यालये यांचे संगणकीकरण आणि ई-प्रशासनाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> :

शासन या निर्णयान्वये कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्यव्यवसाय विभागातील पदुम विभागाकरीता तसेच त्याखालील क्षेत्रिय कार्यालये यांचे संगणकीकरण आणि ई-प्रशासनाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) गठीत करण्यास मान्यता देत आहे :-

अ.क्र.	अधिका-यांचे पदनाम	समितीचे पद
१.	प्रधान सचिव/सचिव (पदुम)	अध्यक्ष
२.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त) किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
३.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन) किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
४.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,उद्योग किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
५.	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,माहिती व तंत्रज्ञान किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
६.	आयुक्त, पशुसंवर्धन /दुग्धव्यवसाय / मत्स्यव्यवसाय	सदस्य
७.	उपसचिव, पशुसंवर्धन /दुग्धव्यवसाय / मत्स्यव्यवसाय	सदस्य
८.	राष्ट्रीय सुचना केंद्राचे प्रतिनिधी (NIC) (आवश्यकतेनुसार)	सदस्य
९.	माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील बाहेरचे तज्ञ (आवश्यकतेनुसार)	सदस्य
१०.	अवर सचिव/कक्ष अधिकारी, पशुसंवर्धन /दुग्धव्यवसाय / मत्स्यव्यवसाय	सदस्य सचिव

उपरोक्त समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे:-

(१) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्यव्यवसाय विभागाच्या ई-प्रशासन धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते हार्डवेअर/सॉप्टवेअर उपलब्ध करण्यासाठी आवश्यक त्या अनुषंगिक बाबींवर निर्णय घेणे.

(२) विभागामार्फत राबविण्यात येणा-या संगणकीकरण प्रकल्पांची व्याप्ती ठरविणे.

(३) विभागामार्फत राबविण्यात येणा-या समितीच्या कार्यक्षेत्रानुसार ई-गव्हर्नन्स प्रकल्प सुरु करण्यासाठी RPF (Request for Proposal) अंतिम करुन निविदा प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणे.

(४) विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध संगणकीकरण प्रकल्पांकरिता आय.टी.सोल्यूशन प्रोव्हायडर कंपन्यांची निवड करुन प्रकल्प प्रस्तावास विहित कार्यपध्दतीने मंजूरी देणे.

(५) विभागाच्या ई-गव्हर्नन्सबाबतच्या कामाचा आढावा घेणे.

(६) सामान्य प्रशासन विभागाने (माहिती तंत्रज्ञान विभाग) वेळोवळी घेतलेल्या निर्णयानुसार तसेच प्रदान केलेल्या अधिकारानुसार प्रकल्प अंमलबजावणी समितीस अधिकार राहतील.

(७) रु.१० लक्ष ते रु.५ कोटीपेक्षा (किंवा माहिती तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.वि) यांनी घेतलेल्या त्या त्या वेळेच्या धारेणानुसार) रकमेच्या ई-प्रशासनासंबंधीच्या कामांना मान्यता देणे.

(८) प्रकल्प अंमलबजावणी समितीद्वारे मंजूर झालेल्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार वित्त विभाग,शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,दि.१७/४/२०१५ च्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८,मधील भाग पहिला,उपविभाग तीनच्या अनुक्रमांक चार,परिच्छेद क्रमांक २७(२) नुसार राहतील. ई-प्रशासन प्रकल्पाच्या मंजूरीबाबत समितीमध्ये एकवाक्यता न झाल्यास प्रकल्प माहिती तंत्रज्ञान विभागाच्य शासन निर्णय दि.५/१०/२००१ अन्वये गठीत केलेल्या उच्चाधिकार समितीकडे मान्यतेस्तव सादर करण्यात यावे.

(९) वरीलप्रमाणे गठित करण्यात आलेल्या समितीने प्रकल्पांना मान्यता दिल्यानंतर संगणकीकरण व तद्नुषंगिक बाबी म्हणजेच संगणंक,सॉप्टवेअर,हार्डवेअर इत्यादी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी तसेच संगणक प्रणालीचे विकसन (Software Development), संदर्भाधिन शासन निर्णयानूसार व वेळोवेळी निश्चित होणा-या शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या धोरणानुसार करण्यात यावे.

(१०) समिती समोर विचारार्थ विषयाशी संबधित कार्यासनाचे अवर सचिव/कक्ष अधिकारी हे उपरोक्त समितीचे सदस्य सचिव असतील, ज्या कार्यासनाशी संबंधित विषय बैठकीत असेल त्या कार्यासनाने प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक आयोजित करणे,बैठकीचे इतिवृत्त तयार करणे व त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करणे या सर्व बाबी विषयाशी संबधित कार्यासनाने करावयाच्या आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०३१७१६२५९३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Shaligram Govil

Digitally signed by Rajesh Shaligram Govil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture & ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c549410b2251df8c92783a2da17afcacbe7f8fe3a4fd88f156fea84433871f11, cn=Rajesh Shaligram Govil
Date: 2019.05.03 17:26:13 +05'30'

(राजेश गोविल)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग.

२) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग.

३) प्रधान सचिव (पदुम), पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

४) प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

५) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग.

६) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई.

७) आयुक्त, पशुसंवर्धन/दुग्धव्यवसाय/मत्स्यव्यवसाय.

८) संचालक, नॅशनल इन्फॉमेटिक्स सेंटर, ११ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई.

९) विभागातील सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव कृषि व पदुम विभाग.

१०) विभागातील कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग.

११) निवडनस्ती.